लोकमत

# बालिकेवर अत्याचार करणाऱ्या आरोपीला २० वर्षे सश्रम कारावास

लोकमत न्यूज नेटवर्क



**वसमत :** लग्नाचे आमिष दाखवून अल्पवयीन मुलीला पळवून नेऊन तिच्यावर लैंगिक अत्याचार करणाऱ्या आरोपीला वसमत येथील सत्र न्यायालयाने २० वर्षे सश्रम कारावास आणि दंडाची शिक्षा सुनावली आहे. तसेच इतर गुन्ह्यांसाठी दोषी ठरवून दोन वर्षांचा सश्रम कारावास आणि दंडाची शिक्षा सुनावली आहे.

**५ मार्च २०२२ रोजी आरोपीने अल्पवयीन मुलीस पळविले होते**

ऊसतोड कामगार असलेल्या पीडित मुलीच्या वडिलांनी यासंदर्भात ११ मार्च २०२२ रोजी हट्टा पोलिस ठाण्यात तक्रार दिली होती. ५ मार्च २०२२ रोजी मध्यरात्री ते कुटुंबासह ऊसतोडणीच्या कामासाठी टेंभुर्णी शिवारातील झोपडीत झोपले होते. त्यावेळी शेजारी राहणाऱ्या ऊसतोड कामगाराचा मुलगा सागर रमेश इंगोले याने अल्पवयीन मुलीला लग्नाचे आमिष दाखवून पळवून नेले, अशी तक्रार त्यांनी दिली होती. याप्रकरणी भादंवि कलम ३६३ अन्वये गुन्हा दाखल झाला होता. पोलिस उपनिरीक्षक पठाण यांच्याकडे या प्रकरणाचा तपास सोपविण्यात आला होता. तपासादरम्यान, आरोपीने अल्पवयीन मुलीला पळवून नेऊन अहिल्यानगर येथे तिच्यावर लग्नाचे आमिष दाखवून वारंवार लैंगिक अत्याचार केल्याचे उघड झाले. त्यामुळे तपासी अधिकारी पोलिस उपनिरीक्षक पठाण यांनी आरोपीविरुद्ध वसमत येथील सत्र न्यायालयात पॉक्सो कायद्याच्या विविध कलमांन्वये आणि भादंवि कलम ३६३, ३६६, ३७६ अन्वये दोषारोपपत्र दाखल केले होते.

या प्रकरणात वसमत येथे सरकार पक्षाच्या वतीने साक्षीपुरावे सादर करण्यात आले. अंतिम सुनावणीनंतर सत्र न्यायाधीश आर. आर. हस्तेकर यांनी आरोपी सागर इंगोले याला पॉक्सो कायद्यांतर्गत विविध कलमांन्वये दोषी ठरवून २० वर्षे सश्रम कारावास आणि १ हजार रुपये दंड, दंड न भरल्यास १० दिवसांची अतिरिक्त शिक्षा सुनावली. तसेच भादंविच्या विविध कलमांन्वये २ वर्षे सश्रम कारावास आणि १ हजार रुपये दंड, दंड न भरल्यास १० दिवसांची कैद, अशी शिक्षा सुनावली. या प्रकरणात सरकार पक्षाच्या वतीने अतिरिक्त सरकारी अभियोक्ता संजय देशमुख यांनी बाजू मांडली. त्यांना कोर्ट पैरवी अधिकारी उत्तमराव वैद्य यांनी मदत केली.